# ओबीसी सामाजिक न्याय: संविधानिक तरतुदी व राजकीय प्रक्रियेवरील परिणाम

**सहा. प्रा. धर्मवीर शाहू क्षीरसागर,** कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय गडहिंग्लज,

dharmvirdemocracy@gmail.com

---

**गोषवारा:** भारतीय संविधानाने सामाजीक न्यायचे तत्व मान्य केले आहे. त्यानुसार अनुसूचित जाती-जमाती सोडून खूप मोठा समाज मागास असल्याचे मान्य करून मागील 75 वर्षात इतर मागास वर्गाचा सामाजिक न्यायाचा प्रश्न भारतीय राजकारणात महत्वाचा ठरला आहे. या अनुषंगाने संविधानकारांकडून संविधानात तरतुदी करण्यात आल्या. अभ्यास आयोग स्थापन करण्यात आले. वेळोवेळी संविधानात बदल करण्यात आले. संसदेने कायदे पारित केले. या सर्वांचा भारतीय राजकीय प्रक्रियेवर व्यापक परिणाम झाला. या सर्व बाबींचा सविस्तर अभ्यास या शोध निबंधात केला आहे.

**पद्धती**: 'ओबीसी बाबत सामाजिक न्यायाचा तरतुदींचा भारतीय राजकीय प्रक्रियेवर राजकीय, सामाजिक व आर्थिक परिणाम घडत गेले आहेत' या गृहितकावर प्रस्तुत संशोधन आधारलेले आहे. संशोधनाचे हेतू 1. ओबीसी संदर्भात संविधानातील सामाजिक न्यायाच्या सर्वसाधारण तरतुदी, इतर मागासवर्गीय संदर्भात सामाजिक न्यायासाठी केलेल्या घटनादुरुस्त्या, संसदेने ओबीसींसाठी केलेले महत्त्वपूर्ण कायदे व संस्था यावर प्रकाश टाकणे. 2. ओबीसी बाबतच्या घटनादुरुस्त्या व कायदे यांचा भारतीय राजकीय प्रक्रियेवर झालेला परिणाम अभ्यासने हे आहेत. संशोधासाठी व्दितिय माहिती स्रोतांचा वापर केला असून ऐतिहासिक व स्पष्टीकरणात्मक पद्धतीचा अवलंब केला आहे.

**सामाजिक न्याय:** 'व्यक्ती व्यक्ती मध्ये जात, धर्म, वंश, पंथ, वर्ण, जन्मस्थान व लिंगभाव या सामाजिक आधारावर भेदभाव न मानता प्रत्येक व्यक्तीला विकासाची समान संधी उपलब्ध करून देणे म्हणजे सामाजिक न्याय होय.' सामाजिक न्यायामध्ये भेदभावरहित सामानातेबरोबर सकारात्मक समानता मान्य केली जाते. सामाजिक न्याय ही सातत्यपूर्ण चालणारी प्रक्रिया आहे. यामध्ये सत्ता (अधिकार), संपती (नैसर्गिक संसाधने) आणि प्रतिष्ठा (मूल्य) यांच्या रास्त वितरणाला महत्व असते. लाभ आणि भार यांचे संतुलित वितरण करण्याचा प्रयत्न केला जातो. सामाजिक न्यायामध्ये आर्थिक परिप्रेक्षातून कोणास काय मिळावे याबाबत मांडणी केली जाते. गरीब, मागास, वंचित, विकलांग, निराश्रित, अल्पसंख्याक व असमर्थ तळागाळातील लोकांचे हित जोपासले जाते. एकूणच सामाजिक न्यायामध्ये नैतिक तत्वे आणि वैधानिक तरतुदी यांचा मेळ घातला जातो.

**राजकीय प्रक्रिया:** राजकीय संस्था आणि लोक यांच्यामध्ये मध्यस्थीची जी प्रक्रिया घडून येते त्यास राजकीय प्रक्रिया संबोधले जाते. राजकीय प्रक्रिया संस्थात्मक चौकटीमध्ये सामाजिक आधारावर घडून येते. राजकीय प्रक्रिया एकसूत्री नाही ती वेगवेगळ्या प्रकारच्या धाग्यापासून बनते. राजकीय प्रक्रिया गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. व्यक्ती, राजकीय संस्था (ग्रामपंचायत ते संसद), कायदा (घटनात्मक व शासकीय), सामाजिक घटक (जात, धर्म, वंश, भाषा, प्रदेश, लिंग), आर्थिक घटक हे राजकीय प्रक्रियेचे पाच आधार आहेत. सहमतीची (मतदान, निवडणूक, धोरणांना समर्थन) किंवा संघर्षाची/ असहमतीची प्रक्रिया घडून येते.

**इतर मागास वर्ग:** पंडित नेहरू यांच्या मते, 'जे दलित नाहीत आणि उच्चवर्णीयही नाहीत ते इतर मागासवर्गीय आहेत'. भारतीय संविधानानुसार इतर मागासवर्गीयांचे वर्णन सोशली अॅड एज्युकेशनली बॅकवर्ड क्लासेस अर्थात शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास असे केले आहे. मंडल आयोगानुसार इतर मागासवर्गीयांच्या तीन हजार सातशे त्रेचाळीस जाती आहेत. राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाच्या इ.स.2006 मधील नोंदीनुसार इतर मागासवर्गीयांमध्ये 5013 जाती मान्य केल्या आहेत. इतर मागासवर्गीयांमध्ये हिंदू, मुस्लिम, ख्रिस्चन, शीख, जैन, बौद्ध इत्यादी धर्मातील लोकांचा समावेश होतो.

**ओबीसी न्यायासाठी स्थापन केलेले आयोग:**

**1. काका कालेलकर आयोग:** 26 जानेवारी 1950 रोजी काका कालेलकर यांच्या अध्यक्षतेखाली पहिला मागासवर्गीय आयोग स्थापन करण्यात आला. 30 मार्च 1955 रोजी आयोगाने अहवाल सादर केला. आयोगाच्या अभ्यासानुसार इतर मागासवर्गीयांच्या 2399 जाती आहेत त्यातील 837 जाती अतिमागास आहेत. 1961 सालची जनगणना प्रत्येक जातीनुसार व्हावी, मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी तांत्रिक व व्यावसाईक शिक्षण संस्थांमध्ये 70 टक्के जागा राखीव ठेवाव्यात, सर्व सरकारी सेवा व स्थानिक संस्थांमध्ये मागासवर्गीयांसाठी जागा राखीव ठेवाव्यात, या शिफारशी करण्यात आल्या. जात हीच मागासलेपणाची कसोटी असावी असा महत्वपूर्ण निष्कर्ष आयोगाने काढला. परंतु मागासवर्गीयांना ओळखण्याच्या वस्तुनिष्ठ कसोट्या वापरल्या नसल्याचे सांगून हा अहवाल सरकारने नाकारला.

**2. मंडल आयोग:**1 जानेवारी 1979 साली बी. पी. मंडल यांच्या अध्यक्षतेखाली ओबीसीचा अभ्यास करण्यासाठी आयोग स्थापन करण्यात आला. इ.स.1980 साली आयोगाने अहवाल सादर केला. आयोगानुसार इतर मागासवर्गीयांमध्ये 3743 जाती मान्य केल्या. या जाती एकूण लोकसंख्येच्या 52 टक्के असल्याचा निष्कर्ष काढला गेला. यांना 27 टक्के आरक्षणाची शिफारस करण्यात आली. सर्व सरकारी व सरकारी अनुदान प्राप्त संस्थांतील शिक्षण, नोकरी व बढती मध्ये 27 टक्के आरक्षण ठेवण्याचे सुचवले गेले.

**ओबीसी संदर्भात संविधानातील सामाजिक न्यायाच्या सर्वसाधारण तरतुदी**:

1. भारतीय संविधानातील कलम 340 नुसार ओबीसीच्या कल्याणाचे उत्तरदायित्व सरकारवर टाकण्यात आले आहे. या नुसार भारतातील शैक्षणिक व सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या वर्गांच्या परिस्थितीचा आढावा घेऊन शिफारशी करण्यासाठी आयोगाची स्थापना राष्ट्रपती करू शकतील अशी तरतूद करण्यात आली आहे.

2. भारताच्या सरनाम्यामध्ये सामाजिक, राजकीय, व आर्थिक न्यायाचे आश्वासन देण्यात आले आहे. त्यामुळे भारतीय संविधान हा सामाजिक न्यायाचा मूळ स्त्रोत आहे.

3. कलम 15 अंतर्गत राज्याला धर्म, जात, वंश, लिंग, व जन्मस्थान या कारणावरून सार्वजनिक ठिकाणी प्रवेश करताना भेदभाव करता येणार नाही. यामध्ये पुढे अशी तरतूद करण्यात आली की या कलमामुळे सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या कोणत्याही वर्गाच्या उन्नती करता कोणतीही विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही. या आधारावर इ.स.1990 मध्ये मंडल आयोगाच्या शिफारशी स्वीकारून इतर मागासवर्गीय यांना 27 टक्के आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे.

4. कलम 16 (1) प्रमाणे राज्यातील सेवा व पद नियुक्त्याबाबत सर्व नागरिकांना समान संधी असेल. या तरतुदीनुसार सर्व मागास जातींना आपल्या क्षमतेनुसार प्रतिनिधित्त्व मिळविण्याचा मार्ग मोकळा झाला.

5. कलम 16 मधील (4) प्रमाणे राज्यसेवांमध्ये ज्या मागास प्रवर्गाला पर्याप्त प्रतिनिधित्व मिळाले नाही, यांच्यासाठी पदे राखून ठेवताना समान संधीचे तत्व प्रतिबंध करणार नाही. अशी तरतूद करण्यात आली आहे.

6. कलम 19 अंतर्गत विचार-अभिव्यक्ती स्वातंत्र्य, संघटन स्वातंत्र्य, निवास स्वातंत्र्य, संचार स्वातंत्र्य, शांततेत सभा घेण्याचे स्वातंत्र्य व व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य देऊन सामाजिक न्यायाची प्रस्थापना केली आहे.

7. कलम 39 (क) प्रमाणे आर्थिक असमर्थते मुळे विधीविषयक साह्य राज्य उपलब्ध करून देईल असे आश्वासन मार्गदर्शक तत्वात नमूद केले आहे.

8. कलम 46 नुसार राज्य इतर दुर्बल वर्गाचे आर्थिक व शैक्षणिक हित संवर्धन करेल अशी तरतूद केली आहे.

9. कलम 246 (घ) मधील सहा प्रमाणे राज्याच्या विधानमंडळांस मागासवर्गीय नागरिकांसाठी पंचायत राज मध्ये जागा राखीव ठेवण्यास प्रतिबंध नसेल असे नमूद केले आहे.

10. सोळाव्या भागातील कलम 340 नुसार मागासवर्गाच्या स्थितीचे अन्वेषण करण्यासाठी राष्ट्रपती हे आयोगाची स्थापना करू शकतील.

**इतर मागासवर्गीय संदर्भात सामाजिक न्यायासाठी केलेल्या घटनादुरुस्त्या:**10 मे 1951 ते 25 जानेवारी 2020 पर्यंत 104 घटना दुरुस्त्या करण्यात आल्या आहेत. यामध्ये ओबीसीच्या सामाजिक न्यायासंदर्भात पुढील दुरुस्त्या केल्या आहेत.

**1. 73 वी घटनादुरुस्ती (1993):-** 1991 साली पी. व्ही. नरसिंह राव यांच्या काळात पंचायत राज दुरुस्ती विषयक विधेयक मांडले. हे विधेयक 20 एप्रिल 1993 रोजी राष्ट्रपतीची सही होऊन मंजूर झाले. यातील कलम 243 मध्ये घटना दुरुस्ती करण्यात आली व अकरावे परिशिष्ट जोडले गेले. कलम 243 (ड) नुसार मागासवर्गातील प्रवर्गाच्या नागरिकांना पंचायत राज्याच्या संस्थांमध्ये 27 टक्के जागा आरक्षित ठेवल्या आहेत. यापैकी एक तृतीयांश जागा त्याच प्रवर्गातील स्त्रियांसाठी राखीव ठेवल्या गेल्या. परिशिष्ट 11 मधील अनुच्छेद 243 (छ) मध्ये पंचायत राज संस्थांकडे 29 विषय सोपवले त्यातील सत्ताविसाव्या विषयाअंतर्गत दुर्बल घटकांच्या कल्याणाची जबाबदारी पंचायत संस्थांकडे सोपविण्यात आली.

**2. 74 वी घटनादुरुस्ती (1993):** 20 एप्रिल 1993 ला 74 वी घटनादुरुस्ती मंजूर होऊन 1 जून 1993 पासून लागू करण्यात आली. यानुसार कलम 243 मध्ये दुरुस्ती करून उपकलम त, य, आणि घ जोडण्यात आले. याशिवाय बारावे परिशिष्ट देखील जोडले. यानुसार मागास प्रवर्गासाठी नगरपालिकात राखीव जागा ठेवण्याचा अधिकार राज्य विधिमंडळाला देण्यात आला.

3. **93 घटना दुरुस्ती (2005):** 20 जानेवारी 2006 रोजी, 93 घटना दुरुस्ती करून कलम 15 मध्ये बदल करण्यात आली. ज्यानुसार अनुसूचित जाती जमातीबरोबर इतर मागासवर्गीयांना सरकारी शिक्षण संस्थांबरोबर खासगी शिक्षण संस्थांमध्ये आरक्षण राज्याला देण्याचे अधिकार प्राप्त झाले.

4. **102 वी घटनादुरुस्ती (2018):**11 ऑगस्ट 2018 मध्ये 102 वी घटनादुरुस्ती केली. यानुसार 338 (बी), 342 (ए) व 366 मध्ये दुरुस्ती केली आणि राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाला संविधानात्मक दर्जा देण्यात आला.

**संसदेने ओबीसींसाठी केलेले महत्त्वपूर्ण कायदे व संस्था:** इ.स.1985 पर्यंत मागासवर्गीयांसाठी केंद्रीय गृह मंत्रालयाच्या अंतर्गत मागास वर्गीय कक्ष कार्य करीत होता. इ.स.1985 साली मिनिस्ट्री ऑफ वेल्फेअर स्थापन करण्यात आले. इ.स.1998 साली त्याचे नामकरण मिनिस्ट्री ऑफ सोशल जस्टिस अँड एम्पॉवरमेंट असे करण्यात आले. या अंतर्गत अनुसूचित जाती - जमाती व इतर मागासवर्गीयांच्या हिताचे धोरण राबवले जाते. इतर मागासवर्गीयांच्या सामाजिक न्यायासाठी नॅशनल बॅकवर्ड क्लासेस फायनान्स अँड डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन व नॅशनल कमिशन फोर बॅकवर्ड क्लासेस या दोन संस्था स्थापन करण्यात आल्या.

1. नॅशनल कमिशन फॉर बॅकवर्ड क्लास अॅक्ट (1993) : यानुसार राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाची स्थापना करण्यात आली. पुढे 2018 मध्ये 102 वी घटना दुरुस्ती करून आयोगाला घटनात्मक दर्जा देण्यात आला. मागासवर्गीयांच्या हिताच्या दृष्टीने अध्ययन, अवलोकन व धोरण निश्चिती च्या कार्यात आयोग सहाय्य करतो.

2. नॅशनल बॅकवर्ड क्लास फायनान्स अँड डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन: इतर मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी व आर्थिक दर्जा सुधारण्यासाठी कार्य करण्यासाठी ही संस्था स्थापन करण्यात आली.

**ओबीसी बाबतच्या घटनादुरुस्त्या व कायदे यांचा भारतीय राजकीय प्रक्रियेवर झालेला परिणाम**

1. सर्वप्रथम 1975 साली केरळ विरुद्ध एन. एम. थॉमस केसमध्ये न्यायमूर्ती कृष्ण अय्यर यांनी क्रिमिलियरचा मुद्दा पुढे आणला. क्रिमिलियर पेक्षा नॉन क्रिमिलियर हे अधिक मागास समजले गेले

2. इ.स.1992 साली मागासलेपणाचे 11 निर्देशके निश्चित करण्यात आले.

3. राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाने ओबीसींच्या मागास, अधिक मागास व अत्यंत मागास अशी वर्गवारी करून त्यात 27 टक्के आरक्षणाचे वाटप व्हावे, अशी शिफारस केली.

4. इ.स.2006 चाली देशपातळीवर आरक्षण विरोधी आंदोलन घडून आले.

5. दिनांक 7 एप्रिल 2007 मध्ये एका जनहित याचिकेनुसार आय. आय. टी. व आय. आय. एम. मधील ओबीसींच्या 27 टक्के आरक्षणाला स्थगिती दिली.

6. ऑक्टोबर 2017 मध्ये राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी पूर्व मुख्य न्यायाधीश जी. रोहिणी यांच्या अध्यक्षतेखाली 340 व्या कलमा अन्वये पाच सदस्यीय आयोगाची स्थापना केली. ओबीसी मधील उपवर्गीकरणाचा अभ्यास करून मापदंड सुचवणे हा याचा हेतू होता. आयोगाच्या अहवालानुसार 97 टक्के ओबीसी आरक्षणाचे लाभार्थी कुर्मी, जाट, शैनी, थेनर, एझावा व बोकल्लीगा जाती आहेत.

7. इ.स.1990 चाली मंडल आयोगाच्या शिफारशी मान्य करण्यात आल्या त्याविरोधात देशभर आंदोलन सुरू झाले परिणामी पी व्ही नरसिंहराव यांनी पुढारलेल्या जातीतील गरिबांसाठी दहा टक्के आरक्षणाची घोषणा केली

8. इ.स.1990 नंतर भारतीय राजकारणात ओबीसी जातींच्या राजकारणाला महत्त्व प्राप्त झाले. इतर मागासवर्गीयांच्या राजकारणातून मुलायम सिंग यादव, लालूप्रसाद यादव या नेतृत्वाचा उदय झाला. ओबीसी च्या हितसंबधावर आधारित राजकीय पक्ष निर्माण झाले.

9. ओबीसींमध्ये विशिष्ट जाती आरक्षणाचे फायदे मिळवीत राहिल्या यातूनच जाट विरुद्ध गुर्जर संघर्ष तयार झाला . गुर्जर जातीने अनुसूचित जमाती मध्ये समाविष्ट करण्याची मागणी केली. या मागणीला अनुसूचित जमाती मधील मीना जातीने विरोध केला. महाराष्ट्रात मराठा आरक्षणावरून ओबीसी विरुद्ध मराठा असा तणाव दिसून येतो.

10. इतर मागासवर्गीयांच्या आरक्षणातून विशिष्ट लाभार्थी जातींचा अधिक विकास झाला. बहुतांश जाती न्यायापासून वंचित राहिल्या. जातीनिहाय आरक्षणाचा मुद्दा महत्वाचा बनला आहे.

11. आरक्षणावरून खुल्या व मागास जातींमधील तणाव अधिक गडद बनला. विविध स्तरातून आरक्षणाची मागणी व प्रतिरोध वाढत गेला, त्यातूनच आर्थिक मागास घटकांसाठी दहा टक्के आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे.

**संदर्भसूची:**


**1. https://marathivishwakosh.org/48395/**

**2. https://www.jstor.org/stable/4367065**

**3.https://epgp.inflibnet.ac.in/epgpdata/uploads/epgp_content/S000029PE/P001791/M025626/ET/1513665697M-10PartIII.pdf**

**4. https://www.ncbc.nic.in/Writereaddata/ar0809eng.PDF**

**5.https://www.ncbc.nic.in/Writereaddata/Report%20on%20Sub-Categorization%20within%20OBCs%20-2015-%20Pandey635681469081640773.pdf**

**6. https://socialjustice.gov.in/writereaddata/UploadFile/78251687858425.pdf**

**7.https://www.ncbc.nic.in/Writereaddata/Mandal%20Commission%20Report%20of%20the%201st%20Part%20English635228715105764974.pdf**

**8. https://lddashboard.legislative.gov.in/sites/default/files/Marathi%20Savidhan.pdf**

**9. https://legislative.gov.in/the-constitution-amendment-acts/**

**10. https://www.thehindu.com/news/national/other-states/obc-quota-emerges-as-a-new-flashpoint-of-conflict-in-rajasthan-congress/article66129173.ece**

**11.https://www.researchgate.net/publication/233037481_Reservations_Exclusion_and_Conflict_Some_Insights_From_Mandal_and_Mysore**

**12.https://charansingh.org/sites/default/files/2000%20Jaffrelot.%20Rise%20of%20OBCs%20in%20the%20Hindi%20Belt%2C%20JAS.pdf**

**13.https://www.india.gov.in/sites/upload_files/npi/files/amend93.pdf?fbclid%E2%80%89=%E2%80%89IwAR33t3LPSmFiiOrPTReOneb3PHKjjx2aDmuny7DuBcptSGA7U3i-asQKAV0**